# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २४/१०/२०२४ (गुरूवार) दुपार**

---

## पोस्टे रामटेक हद्दीतील पंचाळा मांद्री परिसरात
## अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू काढणाऱ्या इसमांवर कायदेशिर कार्यवाही

आगामी विधानसभा निवडणुक या अनुषंगाने कोणतेही अनुचित प्रकार घडु नये या करीता सुरक्षेतेच्या दृष्टीकोणातून मा. पोलीस अधिक्षक साहेब नागपुर जिल्हा नागपुर ग्रामिण याचे आदेशाने दि. २४/१०/२०२४ रोजी पोस्टे रामटेक हद्दीतील पंचाळा मांद्री परिसरात मोहाफुल गावठी दारू काढणारे इसमावर कार्यवाही करण्यात आली. अवैधरित्या मोहाफुल गावठी दारु काढणारा **आरोपी नामे— नितेश उर्फ डाक्या गोपीचंद दुधपचारे, वय ३५ वर्ष, रा. पंचाळा, जि. नागपूर** हा मोहाफुल रसायन सडवा बाळगुन मोहाफुलाची गावठी दारूची रनिग भट्टी काढतांना मिळुन आला. आरोपीचे ताब्यातून १) दोन प्लॅस्टिक डबकी मध्ये ७५ लिटर मोहफुल गावठी दारू किंमती १५०००/—रु २) १५ प्लास्टीक ड्रम मध्ये मोहफुल रसायन सडवा प्रत्येकी १०० लिटर एकूण १५०० लिटर प्रत्येकी लिटर ३५/— रुपये प्रमाणे एकूण किमती ५२५००/—रु ३) १ लोखंडी ड्रम, किंमती १०००/— रू ४) १ मातीचे माठ व १ जर्मन केटली एकूण २२००/—रु. ४) १५ प्लास्टिक ड्रम किंमत ७५००रु ५) एक लोखंडी शेगडी किंमत १५००/—रु. ६) एक लाल रंगाचा सिलेंडर किंमती ४५००/—रु.

असा एकूण किंमत ८४१००/— रु चा मुद्देमाल मिळून आल्याने मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला. जप्त मुद्देमाल नाश करून सॅम्पल व कागदपत्र पुढील कायदेशीर प्रक्रिये करीता पोलीस ठाणे रामटेक यांचे ताब्यात देण्यात आले. वर नमूद आरोपी विरुद्ध कलम ६५( फ, क, ब, ई) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. श्री हर्ष ए पोद्दार (भा.पो.से.) पोलीस अधीक्षक नागपुर जिल्हा ग्रामीण, मा. श्री रमेश धुमाळ अपर पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामीण यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे, सपोनी. गदादे सा., पोहवा नारायण राठोड, पो.हवा. प्रमोद भोयर, पोहवा हेमंत रंगारी, चापो.हवा. पाटील यांनी पार पाडली.



## पोलीस ठाणे जलालखेडा हद्दीतील मौजा घोगरा येथील अवैधरित्या मोहफूल गावठी दारू विक्री करणाऱ्या इसमावर कायदेशिर कार्यवाही

आगामी विधानसभा निवडणुक अनुषंगाने कोणताही अनुचित प्रकार घडू नये याकरीता सुरक्षेतेच्या दृष्टीकोणातून मा. पोलीस अधिक्षक साहेब नागपुर जिल्हा नागपुर ग्रामिण याचे आदेशाने दि. २३/१०/२०२४ रोजी मौजा घोगरा येथील रूपचंद आप्पाजी पवार रा घोगरा याचे घराच्या बाजूस असलेल्या झोपडीमध्ये मोहफूल दारू तयार करीत असल्याबाबत गोपनीय माहिती मिळाल्याने जलालखेडा पोलीस ठाणेचे अधिकारी व अंमलदार यांनी सदर ठिकाणी छापा टाकून मोहाफुल गावठी दारू काढणारा रुपचंद आप्पाजी पवार यांचेवर कार्यवाही करण्यात आली. आरोपीचे ताब्यातून एकुण मोहाफुल सडवा २२०० लिटर किंमती २,२०,०००/—रू. व मोहफूल गावठी दारु व इतर साहित्य किंमती १६००/—रू असा एकूण २,२१,६००/—रू. चा मुद्देमाल मिळून आल्याने मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला आरोपी विरुद्ध महाराष्ट्र बंदी अधिनीयम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आली आहे.

सदरची कार्यवाही ही मा. श्री हर्ष ए पोद्दार (भा.पो.से.) पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण, मा. श्री रमेश धुमाळ, अपर पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामीण, श्री बापू रोहोम उपविभागीय पोलीस अधिकारी काटोल याचे मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक तुषार चव्हाण, पोलीस उपनिरीक्षक अनिल जोशी, नायक पोलीस अंमलदार फिरोझ शेख यांनी केली

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर